क्रमांक : ७५

महाराष्ट्र विधानपरिषद
पत्रक भाग दोन
बुधवार, दिनांक ४ जुलै, २०१८/आषाढ १३, १९४० (शके)

९३. सदस्यांना सन २०१८-२०१९ च्या पूरक मागण्यांच्या तसेच सन २०१३-२०१४ या वर्षाच्या अतिरिक्त खर्चाच्या प्रती वितरीत केल्याबाबत :-

सर्व सदस्यांना कळविण्यात येत आहे की, मा.वित्त मंत्र्यांनी सन २०१८-२०१९ च्या पुरवणी मागण्या तसेच सन २०१३-२०१४ या वर्षाच्या अतिरिक्त खर्चाच्या मागण्या बुधवार, दिनांक ४ जुलै, २०१८ रोजी सभागृहास सादर केल्या असून या पुरवणी मागण्यांच्या व अतिरिक्त खर्चाच्या प्रती बुधवार, दिनांक ४ जुलै, २०१८ रोजी टपालखणाद्वारे वितरित करण्यात आल्या आहेत.

९४. महाराष्ट्र विधानपरिषदेत सन २०१८-२०१९ च्या पुरवणी मागण्यांवरील चर्चा :-

सन २०१८-२०१९ च्या पुरवणी मागण्या विधानपरिषदेत सोमवार, दिनांक ९ जुलै, २०१८ व मंगळवार दिनांक १० जुलै, २०१८ रोजी चर्चेसाठी घेण्यात येत आहेत. त्याबाबतीत सदस्यांचे लक्ष महाराष्ट्र विधानपरिषद नियम २३० (४) कडे वेधण्यात येत आहे. त्यानुसार पुरवणी मागण्यांवरील चर्चेत जे विवक्षित मुद्दे उपस्थित करावयाचे असतील, अशा मुद्दयांची आगाऊ सूचना देता येईल. वेगवेगळ्या विभागाच्या पूरक मागण्यांविषयीचे विवक्षित मुद्दे शुक्रवार, दिनांक ६ जुलै, २०१८ रोजी सायंकाळी ४.०० वाजेपर्यन्त या सचिवालयाच्या विधानपरिषद ई-२ कक्षात आणून द्यावेत, अशी सदस्यांना विनंती आहे. त्यानंतर प्राप्त झालेले मुद्दे विचारात घेतले जाणार नाहीत. तसेच प्रत्येक विभागाचे मुद्दे स्वतंत्र द्यावेत व मुद्दयांच्या प्रत्येकी तीन प्रती द्याव्यात अशीही सदस्यांना विनंती आहे.

विधान भवन,
नागपूर.
दिनांक : ४ जुलै, २०१८

डॉ. अनंत कळसे
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानपरिषद.

याची प्रत :

१) महाराष्ट्र विधानपरिषदेचे सर्व सदस्य.
२) मा.सभापती, मा. उपसभापती, विधानपरिषद यांचे सचिव तथा खाजगी सचिव
३) मा.विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी.
४) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व अधिकारी.
५) प्रधान सचिव, संसदीय कार्य विभाग, शिबिर कार्यालय, नागपूर.
६) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व पक्ष कार्यालये.
७) संगणक कक्ष (website)
८) एम.के.सी.एल.कक्ष